Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-3, Issue-11, Dec-2013 Available online at www. isrj.net

# अस्तित्ववाद (एक्झिस्टेन्शिअॅलिझम) स्वरुप : एक आकलन

व्ही. एन. पाटील

बी.पी.आर्टस् , के.के.सी. कॉमर्स अॅन्ड एस. एम.एस सायन्स कॉलेज चाळीसगाव

**सारांश** : -आज साहित्यात अनेक वाङ्मयीन संकल्पना अनेक वाद, विचार प्रवाह अस्तित्वात असलेले दिसतात. जसे अभिजात वाद, स्वच्छंदतावाद, वास्तववाद, अतिवास्तववाद, संरचनावाद, विरचनावाद, मार्क्सवाद, गांधीवाद, आंबेडकरवाद, स्त्रीवाद असा कितीतरी विचार प्रणाली अस्तित्वात असलेल्या दिसतात. असे वाद किंवा विचार प्रवाह किंवा चळवळी समाजात किंवा साहित्यात अव्याहतपणे निर्माण होतच असतात. ते जीवनाचे अपरिहार्य अंग असते त्याप्रमाणे समुद्रात लाटा निर्माण होतात तद्वतच समाजात वाद संकल्पना निर्माण होतात.[१] त्या कधी क्षीण तर कधी प्रबळ असतात. एवढेच परंतु ते पुर्णत:नष्ट होत नाही.

## प्रस्तावना :

वाङ्मयातील किंवा साहित्यातील वाद, संकल्पना निर्माण होण्यासाठी विविध कारणे कारणीभूत असली तरी लेखक आणि समीक्षक हे त्यात महत्वाचे घटक आहेत. लेखकाची साहित्यनिर्मिती आणि समीक्षकांचा साहित्यनिर्मिती प्रेरणांचा शोध ही प्रमुख कारणे आढळतात. तर कधी साहित्यकृती आणि समीक्षक यांच्यातील परस्पर क्रियेतून ही संकल्पना, वाद किंवा संप्रदाय निर्माण होतांना दिसतात.

'वाद' ही संकल्पना केवळ साहित्य क्षेत्रात आहे असे नाही, तर जीवनातून वेगवेगळ्या क्षेत्रात ही ती आढळते. तिचा समाजाशी, नैतिक संबंध असतो. त्यामुळे साहित्याचा कधी जीवनावर तर जीवनाचा साहित्यावर परिणाम होतांना दिसतो. अस्तित्ववाद ही विचारसरणी ही अशीच मानवी जीवनातून आकारास आलेली (निर्माण झालेली) विचारसरणी आहे. ते तत्वज्ञान आहे ते अशीरा (अलिकडच्या काळात) निर्माण झालेले आणि लक्षवेधी ठरलेले तत्वज्ञान आहे. या तत्वज्ञानावर जशी बरीच चर्चा होते, तसेच बरेच आरोपही होतांना दिसतात. (उदा. हे तत्वज्ञान नाही, हे नास्तिकवादी आहे, ती एक प्रवृत्ती आहे वगैरे)

मराठी साहित्यात सर्व साधारणपणे १९६० नंतरच अस्तित्वादा संदर्भात लेखन व्याख्याने आणि चर्चा सुरु झालेली दिसते. त्यात प्रा.ग.वा. जोशी[२], प्रा.रा.ग. जाधव[३], दि. के. बेडेकर[४],वसंत पाटील[५] , रा.भी. जोशी[६] प्रभाकर पाध्ये, गंगाधर पाटील, सदा कऱ्हाडे, प्रा.प्र.ना. परांजपे, प्रा.श. दि. कुलकर्णी (परिसंवाद - फेब्रु १९६८), प्रा.अनंत काणेकर, जनार्दन वाघमारे, गो. म. कुलकर्णी, विलास सारंग, रविंद्र किंबहुने, रविन्द्र मनोहर इत्यादींनी लेखन केलेले दिसते.

## पुर्वपिठीका -

अस्तित्वादाची निर्मिती २० व्या शतकात प्राधान्य देशात झालेली दिसते. हे तत्वज्ञान आकारास येण्याच्या दृष्टीने अनेकांचे चिंतन कारणीभूत झालेले आहे. या तत्वज्ञानाची मांडणी करणारे अनेक विचारवंत आहेत. त्यात देकार्त ह्यूम, नित्शे, सोरेन किर्केगार्द (किर्कगार किर्केगार्ड), हायडेगर (हिंयडेगर), गॅब्रिएल मार्सेल, ज्याँ पॉल सार्त्र, प्रत्यर्स, अल्बेर कामू, (अल्बर्ट कामु) इत्यादी विचारवंत असले तरी अस्तित्ववादाचा जनक म्हणुन किर्केगार यांच्याकडेच पाहिले जाते.

अस्तित्ववादी तत्वज्ञानात व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समाज, व्यक्ती-निसर्ग, व्यक्ती-विश्व यांच्या संबंधावर मुलभूत प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. कुठलेही तत्वज्ञान निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करते. अस्तित्ववादाने ही मानवासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचाच प्रयत्न केलेला दिसतो. पुर्वी तत्वज्ञानापुढे ह्या विश्वाची उत्पत्ती कशी झाली? ती कोणी केली ? विश्वाचे मुळ कारण काय? विश्वोत्पत्तीशी मानवाचा संबंध काय? मानवाचे विश्वामधील स्थान काय? या विश्वात शाश्वत

आणि अशाश्वत काय? असे प्रश्न होते या प्रश्नांची उत्तरे ही वेगवेगळ्या पध्दतीने वेगवेगळ्या धर्मग्रंथातून दिलेली आढळतात. अस्तित्ववाद्यांच्या पुढे जो प्रश्न आहे तो म्हणजे मानवी अस्तित्व हा आहे. मानवी अस्तित्वाच्या संदर्भातच हे तत्वज्ञान विचार करते. त्यामुळे त्यांनी मानवाला केंद्रीभूत ठेवून स्वतः ची स्वतंत्र अशी विचारसरणी ज्ञानमीमांसा आणि नीतिमीमांसा ही मांडली.
या विचारसरणीत मी कोण आहे ? मी कोठे आहे ? येथे मी कसा आलो ? का आलो? मला येथे कोणी आणले ? जेव्हा आणले तेव्हा माझी परवानगी का विचारली गेली नाही? मी आता वाट कोणाला विचारली ? असे विविध प्रश्न विचारून त्या अनुषंगाने चिंतन केलेले दिसते.

अस्तित्ववादाचे स्वरुप -

१ ) अस्तित्ववादी तत्वज्ञान हे मानवाला केंद्रस्थानी मानणारे तत्वज्ञान आहे. या विचारसरणीत मानसाचे अस्तित्व 'असणं', मी आहे याला महत्त्व दिले जाते. आणि मग मी कोण आहे. या बद्दलचे चिंतन केले जाते. अस्तित्ववाद्यांच्या मते मी कोण आहे? या प्रश्नाचे आजपर्यंत दिलेले उत्तरे (अहं ब्रह्मास्मि, तत्वमसी किंवा अनाण आम्ही तुम्ही लेकरे, तू सर्वांचा पिता) ही चुकीची आहेत. कारण ही उत्तरे कोणत्यातरी सत्तेच्या, व्यवस्थेच्या संदर्भाधीन राहून दिलेली उत्तरे आहेत. त्यामुळे ती निखालस ओळख नाही. म्हणून कोणत्याही व्यवस्थेचा संदर्भ न घेता 'मी कोण आहे?' याचे उत्तर शोधणे आवश्यक आहे असे हे तत्वज्ञान मानते या विचार सरणीची सुरुवात 'मी आहे, मनुष्य आहे' येथून होते. माणसाचे अस्तित्व एक सत्य आहे. आणि आपल्या बाह्य अस्तित्वाचा संबंध स्वतःशी इतर व्यक्तींशी आणि आपल्या बाह्य अस्तित्वाचा संबंध स्वतःशी इतर व्यक्तींशी आणि समाजाशी येतो. हे संबंधच अस्तित्वाला संदर्भ देतात. माणसाची आपल्या अस्तित्वाला आकार देण्यासाठी किंवा अर्थपूर्ण बनविण्यासाठीची धडपड सतत चालू असते. त्यासाठी तो आपल्या बुध्दीचा आणि इच्छाशक्तीचा उपयोग करतो हे मान्य करतात. परंतु त्यांचे म्हणणे असे की विज्ञानाने कितीही प्रगत केली तरी जीवनाचे रहस्य त्यामुळे उलगडलेले नाही. त्याचप्रमाणे निराश होऊन अध्यात्मकडे वळलो तर तेथे ही सर्वत्र गुढतेचे धुके पसरलेले आहे. व सर्व गोष्टी केवळ अनुमानावर अवलंबून आहेत. जेव्हा कोणताही मार्ग पत्करला तरी आपल्या हाती काहीच लागत नाही. त्यामुळे फक्त आपले असणे किंवा अस्तित्व हेच काय ते महत्वाचे आहे.

२) मानवी अस्तित्वाचा आणि विश्वाचा विचार करताना विश्व आणि विश्वामधील अस्तित्व हे संपूर्णपणे असंबध्द, आतार्किक निरुद्देश असल्याचे आढळून येते. मानवी अस्तित्वाला कोणत्याही प्रकारचे अधिष्ठान नाही. अंतिम सत्तेशी मानवी अस्तित्वाचा असलेला संबंध हा मानवी तर्कशक्तीच्या पलिकडचा असतो. तसेच मानव आणि इतर वस्तु किंवा प्राण्यांच्या (मानवेतर जीवांच्या) संदर्भात सांगताना त्यांच्या जाणीवेत फरक करतात. माणसाला स्वतःच्या असण्याची जाणीव असते. किंवा स्वतःच्या असण्याची जाणीव असते. किंवा स्वतःच्या असण्याची जाणीव असणारे ते अस्तित्व असते. माणसाला स्वतःच्या असण्याची जशी जाणीव असते तशी जाणीव इतर वस्तूंना किंवा प्राण्यांना असत नाही त्यामुळे या विश्वात मानव हा एकाकी पडला आहे? मानवाला जाणीव असते म्हणजे भूत, भविष्य आणि वर्तमान यांची जाणीव असते प्राण्यांना मात्र अशी नसते. आणि अशी जाणीव असणे किंवा समजणे हेच त्याचे खरे अस्तित्व होय असे अस्तित्ववादी मानतात. म्हणून ते To Live and To Exist याला महत्व देतात. To Live म्हणजे केवळ जीवंत असणे. आणि To Exist म्हणजे आपण जगात जगत आहोत. त्याचे अवधान असलेले जगणे होय To Live हे प्राण्यांच्या संदर्भात, झाडांच्या संदर्भात वापरता येते तर To Exist हे मानवासाठीच ते वापरतात (म्हणून इथे माणसाचे विशेषत. प्रत्येक व्यक्तीचे जगणे महत्वाचे मानले जाते) म्हणून माणसाचे जगणे हे प्रत्येक क्षणी गतिमान आणि नेहमी ते असते पण उल्लंघत जाणारे असावे असे मानतात.

३) मानवी जीवन हा एक योगायोग आहे असे अस्तित्ववादी मानतात. त्यास पूर्वनियोजन पूर्वलक्षित किंवा पुनर्जन्म वगैरे काहीही नाही. तसेच ते अनाकलनीय असून पुष्कळदा अर्थशून्य वाटते. आपण कोठून निघाले, कोठे आहोत. कोठे जायचे आहे. याचा पत्ताच लागत नाही. आणि आपण वेगवेगळ्या व्यवस्थेत अडकून पडतो आणि खऱ्या जीवनापासून दूर जातो. म्हणून अस्तित्ववादी-विज्ञान व रुढ धर्मव्यवस्थेचे संदर्भ नाकारतात आणि म्हणतात. समाजातील धार्मिक, सांस्कृतिक व नैतिक समजुती माणसांच्या सहज प्रवृत्तींना दडपतात. त्यांच्या व्यक्ती विकासाला बाधक व मारक ठरतात. मानवाने निर्माण केलेल्या ह्या काल्पनिक तत्वव्यूहाच्या पेऱ्यात तो अडकून पडतो. किंवा पडला आहे. त्यामुळे मानवी अस्तित्वाचा जीवंतपणा, सृजनशीलतेचा झरा नष्ट झालेला आहे. आणि त्यातून त्याला मुक्त करायचे आहे. मुक्त व्हायचे आहे. म्हणजे Exit व्हायचे आहे. हे Exit होणे हेच मानवाचे खरे लक्षण आहे (त्यासाठी संदर्भहित प्रत्यक्ष महत्वाची मानतात)

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-3, Issue-11, Dec-2013 Available online at www. isrj.net

४) जीवन ही एक प्रत्यक्ष अनुभवण्याची गोष्ट आहे. ती खरी खुरी मूर्त स्वरुपाची, अनन्यसाधारण घटना आहे. ती वैचारिक सुसंगतेच्या चौकटीत बसविणे व जगणे अयोग्य आहे. जीवनाचे वैचारिक आकलन आणि प्रत्यक्ष जीवन यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. प्रत्यक्ष जीवन जगण्यासाठी सुसंगत, वस्तुनिष्ठ तत्त्वज्ञानाची काहीच आवश्यकता नसते. मात्र प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे याची वास्तवपूर्ण जाणीव आवश्यकता आहे. असे अस्तित्ववादी मानतात.

५) अस्तित्ववादी मानवी बुध्दी (बुध्दीचे वैशिष्ट्ये तर्कसंगत मांडणी करणे) ही सर्व नसून मानवी जीवनाच्या संदर्भातील एक साधनभूत शक्ती आहे. असे मानतात मानवी अस्तित्व म्हणजे प्रत्यक्ष जीवन जगणाऱ्या हाडामांसाच्या व्यक्तीचे भावनाशील अस्तित्व असते म्हणून ते संकल्पनेत यथार्थपणे व्यक्त करताच येणार नाही. म्हणूनच प्रत्यक्ष जीवन हे प्रत्ययात्मक असते. हा अस्तित्वाचा प्रत्यय शब्दातीत असतो. तो अनुभवणेच महत्वाचे असते. म्हणूनच आधी 'अस्तित्व मग सारतत्व' हे तत्त्व स्वीकारावे लागते. असे मानतात.

६) मानवी अस्तित्व म्हणजे केवळ जीवशास्त्रीय अस्तित्व नव्हे तर ते एक अव्याहत क्रियाशील असे जीवन आहे. आपले जीवन प्रस्थापित करण्यासाठी त्याला सर्वदिन क्रियाशील रहावे लागते. स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी त्याला आचरण करावयाचे असते. आणि आचरणाबद्दल त्याला पूर्ण स्वातंत्र्य असते. हे स्वातंत्र्य म्हणजे निवड स्वातंत्र्य होय. निवड स्वातंत्र्य आचरण्यातच माणसाचे माणूसपण आहे. तेच त्याच्या अस्तित्वाचा आधार आहे. म्हणून या स्वातंत्र्याला निष्ठापूर्वकपणे जपले पाहिजे. आणि त्याप्रमाणे कार्यान्वित होणे महत्वाचे असते.

माणसाने हे निवडस्वातंत्र्य कुठल्याही बाह्य मानदंडाच्या आधार न घेता व्यक्तीगत निर्णयाच्या आधारे घेतले पाहिजे निर्णय घेताना कोणत्याही अवस्थेमध्ये फसगत होईल या धोका पत्करुन स्वातंत्र्यपणे निर्णय घेतला पाहिजे. तसेच कोणत्याही श्रध्देच्या, संकेताच्या किंवा व्यवस्थेच्या आधाराशिवाय माणसाने वर्तन केले पाहिजे. तरच आपले जीवन घडविले असे म्हणता येईल. या विश्वात अनेक गोष्टी अस्तित्वात येत असतात. आणि ही प्रक्रिया अनिवार्यतेच्या तत्त्वानुसार घडत नसते. हे संक्रमण स्वातंत्र्य पूर्वक निवडपूर्वकच होत असते. असे अस्तित्ववादी मानतात. त्याचे म्हणणे भूतकाळात जमा झालेल्या गोष्टी बदलू शकत नाहीत. पण भूतकाळातील घटना म्हणजे काही जग नव्हे भूतकाळातील जग वर्तमानकाळात, वर्तमान काळातील भविष्यकाळात झेप घेत असते आणि हे संक्रमण निवड पूर्वक असते. मानवी स्वातंत्र्य कृतिस्वातंत्र्य यांच्याच आधाराच जगामधील परिवर्तन ही स्वातंत्र्य असतात. असे अस्तित्ववादी मानतात.

७) मनुष्यासमोर आचरणाच्या निवडीसाठी अनेक पर्याय असतात. आणि या पर्यायापैकी कोणता ना कोणता पर्याय निवडण्याच्या निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य माणसाला असते हे खरे पण त्याच वेळी इतर पर्याय धिक्कारावे लागतात आपण घेतलेला निर्णय हा योग्यच परिणाम घडवून आणणारा असेल याची खात्री कोणालाच देता येत नाही. म्हणून त्याची जबाबदारी स्वतःच स्वीकारावी लागते असे अस्तित्ववादी मानतात म्हणून हा निर्णय म्हणजे एक प्रकारे अंधारातील उडीच असते त्यामुळे स्वातंत्र्याबरोबर चिंतेचा उगम होतो. आणि ताण सहन करावा लागतो.

८) अस्तित्ववादात 'मानवाचे जीवन असंगत आहे' (म्हणजे अर्थशून्य नव्हे) असे मानले जाते (आल्बेर कामू यांनी या संदर्भात सिसिफसची कथा सांगितलेली आठवावे) असंगतीही हीच मानवाची अपरिहार्य प्रकृती असून जीवनाचा सुसंगत अर्थ लावणे ही आत्म्याची एक आधिभौतिक भूक आहे. पण तिचे शमन मात्र होऊ शकत नाही. जीवनाचा सुसंगत अर्थ लागू शकत नाही. जीवनाचे अंतिम स्वरुप आणि तिचे आपल्या बुध्दीने केलेले आकलन यांच्या दरम्यान एक प्रचंड दरी असते. आणि तिच्यावर वैचारिक पूल बांधण्याची शक्ती मानवी बुध्दीत नाही. थोडक्यात आपले जीवन आणि सभोवतालचे विश्व यात एक द्वैतच आहे. विश्व अफाट आहे पण आपल्या बौध्दिक आकलनाला मर्यादा असते. आत्म्याची झेप अमर्याद आहे पण वास्तवाच्या पाय जखडलेला आहे काल अक्षय असतो पण जीवन क्षणभंगुर असते. तसेच हे विश्व बधिर आहे. येथे जगण्यासाठी खुणा गवसत नाहीत. आणि मग जीव गलबलतो. विचार आणि वास्तव अर्थ आणि त्याचा तो अर्थ असतो ही वस्तुस्थिती या दोहोत कायम फट असते या फटीचे भान म्हणजेच असंगतीचे भान होय. असे अस्तित्ववादी मानतात. या मधूनच परात्मतेची भावना निर्माण होते.

९) अस्तित्ववादात व्याकुळतेला महत्व दिले जाते. मानवी जीवनात व्याकुळता, वेदना, चिंता, उद्वेग, विषण्णता, अस्वस्थता, खिन्नता नैराश्य, भिती, वैफल्य या भावनांना महत्व दिले जाते. ही सर्व व्याकुळतेचीच रुपे मानली जातात. या व्याकुळतेचे बौध्दिक विश्लेषण

करता येत नाही. संभवत नाही. ही व्याकुळता केवळ भोगता येते. ही व्याकुळता जितकी तीव्र तितकी अस्तित्वाची जाणीव ही टोकदार बनते. त्यातूनच स्वतःच्या आयुष्याचे दर्शन घेता येते. आणि आयुष्याची वैयर्थता ही स्पष्ट होते.

१०) अस्तित्ववादात मृत्युला, मृत्यु संकल्पनेला विशेष महत्व दिले जाते. जीवशास्त्रानुसार देहधारणेनंतर चैतन्याचा उदय होतो. व शरीराची गती थांबतात चैतन्याचा ही लोप होतो. मृत्यु म्हणजे केवळ शून्यावस्थाच होय. मृत्यु ही एक अटळ बाब आहे. त्यामुळे न बिचकता मृत्युला सामोरे गेले पाहिजे. जे जे जीवन माणसाला प्राप्त आहे आहे. ते नीती अनीतीच्या कल्पना बंधनानी जखडून न टाकता स्वतःच्या अनुभवाचे वैचित्र्यपूर्ण असे जीवन उत्कटपणे जगले पाहिजे (नैसर्गिक प्रवृत्तीच्या मुक्त संचारानेच व्यक्तीला सत्याचा अनुभव येईल) व मुक्ती मिळेल असे अस्तित्व वाद्यांना वाटते.

थोडक्यात -

* अस्तित्ववाद 'असण्याला' महत्व देतो.
* मानवाने निर्माण केलेल्या काल्पनिक व्यूहातून माणसाला मुक्त करून जीवंतपणा, सृजनशीलता जपण्याचा प्रयत्न करतो.
* मानवी जीवनाकडे 'योगायोग' म्हणून पाहतो.
* स्वतःच्या असण्याची जाणीव असण्यावर भर देतो.
* इतरांच्या अनुषंगाने, दृष्टीकोणातून, संदर्भाच्या साहयाने स्वतःकडे पाहत नाहीत स्वतःचा जीवनमार्ग स्वतः निवडण्याला महत्व देतो.
* निवडस्वातंत्र्याला महत्व देतो.
* उत्कटतेने जीवन जगण्यावर भर देतो. व्याकुळता ही अपरिहार्य मानतो.
* मृत्यु ही जीवनातील अटळ घटना असली तरी त्याचे भय बाळगु नये किंवा तिचा विसर पडू नये.

आधारभूत ग्रंथ -

१) डॉ. जनार्दन वाघमारे - चिंतनयात्रा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद पृ. १४५
२) ग. बा. जोशी - मुद्रा नियतकालिक, एप्रिल, पुणे, ऑक्टोबर, १९६६
३) रा.ग. जाधव - प्रतिष्ठान, ऑक्टोबर, १९६६
४) दि.के.बेडेकर - महाराष्ट्र टाईम्स दिवाळी अंक
५) विश्वास पाटील - अभिरुची, जानेवारी १९६८
६) अनंत काणेकर - नवयुग, दिवाळी अंक
७) संपा. सिताराम रायकर - वाङ्मयीन वाद, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे-३०, प्र.आ.१९९०
८) प्रा. जाधव प्रभाकर - आस्वाद
९) दि. के. बेडेकर - अस्तित्ववादाची ओळख, कॉनस प्रकाशन, पुणे प्र.आ.१९७२
१०) विलास सारंग - सिसिफस आणि बेलाक्वा, प्रात प्रकाशन, फादिवली पूर्व मुंबई - १, प्र. आ.१९८२
११) रविंद्र न. मनोहर - अस्तित्ववाद, नरसिंह प्रिंटिंग प्रेस, सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद, प्र.आ. १९७९